सोबत : मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. १०/एनजीपी/वेतन तक्रारी /२०१८/१३९, दिनांक ०७.०२.२०१८ यांचे पत्र जोडले आहे.

विषय : राज्यातील व्यावसायीक विनाअनुदानित पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना वेळेवर वेतन मिळत नसल्याबाबत प्राप्त होणा-या तक्रारींबाबत.

---

# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद


**(ISO 9001:2008 प्रमाणित)**

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

http://www.dteau.org Email- roaurangabad@dteaharashtra.gov.in


पृष्ठांकन पत्र क्र. /विकाऔ/शिक्षण/२०१९/३५०

दिनांक :- 25 JAN 2019

प्रति,

**प्राचार्य,**

सर्व अनुदानित/विना-अनुदानित/अभियांत्रिकी/औषधनिर्माण शास्त्र/व्यवस्थापन शास्त्र/ वास्तुशास्त्र, पदवी, पदविका, पद्व्युत्तर पदवी संस्था **औरंगाबाद विभाग**

यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.

**(महेश शिवणकर)**

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत : या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रसिध्दी करीता.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Website : www.dtemaharashtra.gov.in


<u>परिपत्रक</u>

जा.क्र.१०/एनजीपी/वेतन तक्रारी/२०१८/१३९
दिनांक : ७.२.२०१८

विषय : राज्यातील व्यावसायीक विनाअनुदानित पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना वेळेवर वेतन मिळत नसल्याबाबत प्राप्त होणा-या तक्रारींबाबत.
संदर्भ : संचालनालयाचे परिपत्रक क्र.२/एनजीसी/तक्रार/२०१५/११९७, दि.१.०९.२०१५

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी शै. व. २०१८-१९ करीता प्रसिध्द केलेल्या ॲप्रुवल प्रोसेस हॅन्डबुक मधील प्रकरण ६ मधील परिशिष्ठ ६.४ मधील तरतुदी आणि महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचा Maharashtra Act No. XXXVIII of 1997 मधील तरतुदींचे अवलोकन करून, महाराष्ट्र राज्यातील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व व्यावसायिक विनाअनुदानित पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांना सुचित करण्यात येते की, विनाअनुदानित संस्थेत कार्यरत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना त्यांचे वेतन व इतर अनुषंगिक देय भत्ते नियमीत वेळेवर अदा करण्यात यावेत. राज्यातील विनाअनुदानित संस्थांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना वेळेवर वेतन देण्याबाबत संचालनालयाच्या संदर्भाधीन परिपत्रकान्वये यापूर्वीच निर्देश देण्यात आलेले आहेत.

उपरोक्त प्रमाणे व्यावसायिक विनाअनुदानित पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना वेतन व इतर देय भत्ते यांचे नियमीत प्रदान होत नसल्याच्या तक्रारी /निवेदने या संचालनालयास प्राप्त झाल्यास व सदर निवेदनांमध्ये /तक्रारीमध्ये तथ्य आढळून आल्यास या बाबीची गंभीर दखल घेण्यात येईल. तसेच याबाबत संबंधित संस्थेबाबत शासनामार्फत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद/संबंधित शिखर संस्था आणि महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडे पुढील कारवाई करणेसाठी संचालनालयाकडुन शिफारस करण्यात येईल व त्यामुळे होणा-या पुढील परिणामांस संस्था सर्वस्वी जबाबदार असेल, याची नोंद घ्यावी.

( डॉ. अभय वाघ )
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : १) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपुर यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या विभागातील व्यावसायिक विनाअनुदानित पदविका अभ्यासक्रमांच्या सर्व संस्थांच्या निदर्शनास आणुन परिपत्रकाची काटेकोर अंमलबजावणी करण्याबाबत निर्देशित करण्यात यावे.
२) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांना माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित
३) कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. १६ यांना माहितीकरीता अग्रेषित
४)कार्यासन क्र. ३ यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक संचालनालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे